**वादपत्र निशाणी क्रमांक ०१ वर आदेश**
(पारीत केलेला दिनांक **२५.१०.२०२३**)

०१. प्रतिवादी क्रमांक ०१ गैरहजर.

०२. प्रतिवादी क्रमांक ०१ हा विधीज्ञ **श्री. एस. एच. पटेल** यांच्यामार्फत दिनांक **०१.०७.२०२३** रोजी वकीलपत्र **नि.क्र.२१** अनुसार हजर झाला आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ ने मुदतीत तीस दिवसांच्या आत **कैफियत** दाखल केली नाही. प्रतिवादी क्रमांक ०१ चा कैफीयत दाखल करण्यासाठी मुदत वाढीचा अर्ज **नि.क्र.२७** ९० दिवसांची मुदत संपल्याने **नामंजूर** केला आहे.

०३. प्रतिवादी क्रमांक ०१ ने **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम ०१ सह वाचनीय क्रम ०५ नियम ०१** नुसार मुदतीत **कैफियत** दाखल केली नाही. म्हणून त्याच्याविरुध्द **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०** नुसार दावा '**विना कैफियत**' चालवण्याचा आदेश पारीत करणे न्यायाचे होईल. म्हणून खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

०१. प्रतिवादी क्रमांक ०१ ने मुदतीत कैफियत दाखल केली नाही म्हणून त्याच्याविरुध्द **दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १० नुसार** दावा '**विना कैफियत**' चालवण्यात येतो.

SUBHASH LAXMAN PHULE
Digitally signed by SUBHASH LAXMAN PHULE
Date: 2023.10.25 14:01:25 +0530

**(श्री. सुभाष ल. फुले.)**
**सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, औसा.**
**जिल्हा लातूर.**

**दिनांक :– २५.१०.२०२३.**
**ठिकाण :– औसा.**